महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# प्र क ट न

**विषय- फेब्रुवारी-मार्च २०१७ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या शुल्काबाबत...**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे मार्फत फेब्रुवारी-मार्च २०१७ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेकरिता ऑनलाईन आवेदनपत्रे दिनांक २९/१०/२०१६ पर्यंत स्विकारण्यात आलेली आहेत. तसेच माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेकरिता ऑनलाईन आवेदनपत्रे नियमित शुल्कासह दिनांक ०४/११/२०१६ ते २१/११/२०१६ पर्यंत व विलंब शुल्कासह दिनांक २२/११/२०१६ ते दिनांक २८/११/२०१६ पर्यंत स्विकारण्यात येणार आहेत.

नुकत्याच रू.५०० व रु.१००० च्या चलनी नोटा बंद झाल्याने फेब्रुवारी-मार्च २०१७ साठी इयत्ता १२वी व १० वी च्या परीक्षेला प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क भरताना अनेक अडचणी येत असल्याचे काही शिक्षक, पालक, विद्यार्थी संघटना यांनी मंडळाच्या व शासनाच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत मा.ना.विनोद तावडे, मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांनी तातडीने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शुल्क जमा करण्यासाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सर्व विद्यार्थी व संबंधित पालक, मुख्याध्यापक व प्राचार्य यांना कळविण्यात येते की, त्यांनी सर्वप्रथम दिलेल्या मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी. विद्यार्थ्याकडे शुल्क भरण्यासाठी रक्कम उपलब्ध नसली तरी प्रथम शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्याचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरून तो मंडळाकडे सादर करावा. अशा विद्यार्थ्यांचे शुल्क प्रत्यक्ष मंडळाकडे जमा करण्यासाठी मंडळामार्फत मुदतवाढ देण्यात येत असून त्याचा कालावधी स्वतंत्रपणे म्हणजेच अर्ज भरण्यासाठी निर्धारित केलेला कालावधी संपल्यानंतर कळविण्यात येईल.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) साठी बहुतांश विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे व निर्धारित परीक्षा शुल्क शाळांकडे/मंडळाकडे यापूर्वीच जमा केलेले आहे. त्यासाठी वेगळी मुदतवाढ देण्याची आवश्यकता नाही. तथापि ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप चलनी नोटांअभावी परीक्षा शुल्क व आवेदनपत्रे भरलेली नाहीत अशा विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी तातडीने भरून ती विभागीय मंडळाकडे सादर करावीत व नंतर परीक्षा शुल्क जमा करून घ्यावे. अशा विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क उशीराने जमा करण्यासाठीचा कालावधी मंडळामार्फत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे सर्व संबंधित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही करून सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे वेळेत भरली जातील याबाबत दक्षता घ्यावी. कोणताही विद्यार्थी परीक्षा शुल्कअभावी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यापासून म्हणजेच पर्यायाने परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(कृष्णकुमार पाटील)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४

दिनांक १६/११/२०१६

---

क्र.पुविमं./शाखा अ /परीक्षा./७६६७पुणे- ४११००५ दिनांक - १७.११.२०१६

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये व माध्यमिक शाळा,
जि. पुणे,अहमदनगर, सोलापुर.

उपरोक्त राज्यमंडळाच्या प्रकटनानुसार फेब्रुवारी/मार्च-२०१७ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काबाबत कार्यवाही करण्यात यावी. सदरहु बाब संबंधित विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणुन दयावी.

१८/११/१६

विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११ ००५.